विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, नाशिक/ अमरावती येथील कंत्राटी विशेषतज्ञांची पदांच्या नियुक्ती कंत्राटी तत्वावर करण्यास समिती गठीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः समिती- २०१९/प्र.क्र.२४२/आरोग्य ३

१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००१.
तारीखः २३ जुलै, २०१९.

वाचा :

१) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांकः जिरुन/२००५/१२९६/प्र.क्र.४२४/ आरोग्य ३, दिनांक १५.११.२००६.

२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांकः पदनि २०१५/प्र.क्र.२७२/आरोग्य ३, दिनांक ०२.०१.२०१७ व ०१.०९.२०१७.

३) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांकः पदनि २०१७/प्र.क्र. ४० (भाग-२) / आरोग्य ३, दिनांक २३.०५.२०१८.

४) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांकः पदनि- २०१८/प्र.क्र.३२८/आरोग्य ३, दिनांक २२.०२.२०१९.

५) संचालनालयाचे पत्र क्र. संआसे/कक्ष-३/टे-३/विसंसेरु, अमरावती/कंत्राटी सेवा/६४५७-५९/१९, दिनांक २२.०५.२०१९.

शासन निर्णय-

राज्याच्या ग्रामीण क्षेत्रातील सर्वसामान्य जनतेस ह्रदयविकांर, कर्करोग, मुत्रपिंड विकार तसेच गंभीर अपघातांमुळे विकलांगता टाळण्यासाठी आवश्यक अतिविशिष्ट तज्ञ चिकित्सा सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी महसूल विभागाच्या मुख्यालयी विभागीय संदर्भ सेवा रुग्णालये नाशिक व अमरावती स्थापन करण्यात आली आहेत. तद्नंतर सदर रुग्णालयांमध्ये अतिविशिष्ट तज्ञ चिकित्सा सेवा उपलब्ध करण्यासाठी आवश्यक तज्ञ तसेच अन्य संवर्गातील पदांची निर्मिती संदर्भिय शासन

निर्णयानुसार करण्यात आली आहे. त्यासअनुसरुन सर्व कंत्राटी विशेषतज्ञांची पदे कंत्राटी स्वरुपात भरावयाची असल्याने समितीची स्थापना करणे आवश्यक आहे. याबाबत खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

समिती :-

अ.क्र.	सभासद	पद
१	उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ,नाशिक / अकोला मंडळ, अकोला	अध्यक्ष
२	जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, नाशिक/ अमरावती	सदस्य
३	मुख्य प्रशासकिय अधिकारी, उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक / अकोला	सदस्य
४	वैद्यकिय अधिक्षक, विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, नाशिक / अमरावती	सदस्य सचिव

२. समितीची कार्यकक्षा:-

१. पूर्णवेळ कंत्राटी विशेषतज्ञांच्या नियुक्त्या नियमित पदे भरेपर्यंत ११ महिन्यांच्या कालावधीकरीता करण्यात याव्यात.

२. पूर्णवेळ कंत्राटी विशेषतज्ञांच्या वेतन शासन निर्णय २२.०२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये नमूद केल्यानुसार देण्यात यावे तसेच नियुक्त्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार करण्यात याव्यात.

३. पूर्णवेळ कंत्राटी विशेषतज्ञांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या नियमित पदांप्रमाणे राहतील. परंतु, नियमित पदांवरील हक्क स्थापित करता येणार नाही.

४. कंत्राटी पद्धतीने नियमित नियुक्ती झाल्यावर कोणतेही कारण न देता, त्यांच्या नियुक्त्या संपुष्टात येऊ शकतील.

५. मानधन तत्वावरील विशेषतज्ञांना शासन निर्णय दिनांक १८.०९.२०१० नुसार Per case basis वर मानधन अदा करतेवेळी रुग्णालयातील विशेष कार्यकारी अधिकारी तसेच वैद्यकिय

अधिक्षक सर्जरीच्या प्रकारानुसर रजिस्टर जतन करुन त्यावर स्वाक्षऱ्या कराव्यात व मुख्य प्रशासकिय अधिकारी/प्रशासकिय अधिकारी यांनी शासन निर्णय दिनांक १८.०९.२०१० नुसार ठरवून दिलेल्या दरानुसार रजिस्टर तपासून उपसंचालक यांच्या मान्यतेने मानधन अदा करण्यात यावे.

समितीने आपला अहवाल शासनास दरमहा सादर करावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७२२१०३७२००११७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2019.07.23 16:21:55 +05'30'

(रो.दि.कदम पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा.मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.राज्यमंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. प्रधान सचिव, (आरोग्य), यांचे स्वीय सहायक.
४. आयुक्त, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
५. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
६. उपसंचालक ,अकोला मंडळ / नाशिक,नाशिक मंडळ ,आरोग्य सेवा ,अकोला
७. जिल्हा शल्य चिकित्सकअमरावती /नाशिक ,जिल्हा रुग्णालय ,
८. वैद्यकिय अधिक्षकअमरावती / नाशिक ,विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय ,
९. मुख्य प्रशासकिय अधिकारीअकोला / नाशिक ,आरोग्य सेवा ,उपसंचालक ,
१०.निवडनस्ती (कार्यासन -आरोग्य ३).